### महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

# कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरुण- इस्लामपूर

## राष्ट्रीय सेवा योजना

## विशेष श्रमसंस्कार शिबिर, हुबालवाडी

### ( दि. 5 जानेवारी ते 11 जानेवारी, 2026 )

### अहवाल

**सोमवार, दि. 5 जानेवारी 2026 रोजी** विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन इस्लामपूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक माननीय सोमनाथ वाघ यांच्या हस्ते झाले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजचे प्राचार्य डॉ. नितीन शिंदे हे होते. यावेळी हुबालवाडी गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ. मंगल बाबुराव हुबाले, उपसरपंच माननीय अंकुश विश्वास घाटगे, प्रसिद्ध उद्योजक कॉलेजचे विद्यार्थी श्री बाबुराव तुकाराम हुबाले, मधुकर हुबाले, श्री प्रकाश ज्ञानू शिंदे, संजय तात्या हुबाले, सुनील पांडुरंग फुलारे, कृष्णा हुबाले, सौ.रेखाताई पवार, श्रीमती शमशाद मुलाणी. सौ मंगल कनप तसेच आजी-माजी सरपंच उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मंगळवार दिनांक 6 जानेवारी 2026 रोजी** जिल्हा परिषद शाळा हुबालवाडी येथील शाळा परिसर स्वच्छता व सफाई करण्यात आली. तसेच परसबाग तयार करण्यासाठी जमीनीचे सपाटीकरण करण्यात आले. शाळेभोवताली असणाऱ्या झाडांना आळी करून पाणी घालण्यात आले. दुपारच्या सत्रामध्ये प्रा. हरीश शिंदे यांनी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासात चालना देण्याच्या उद्देशाने सामाजिक समस्यांवर आधारित वाद-विवाद व चर्चासत्राचे आयोजन केले होते. सायंकाळच्या सत्रामध्ये सांगली जिल्हा अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे उपाध्यक्ष माननीय श्री दीपक रामचंद्र कोठावळे यांचे **'श्रद्धा, अंधश्रद्धा व वैज्ञानिक दृष्टिकोन'** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते, या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री उत्तम पांडुरंग गडाडे (माजी ग्रामपंचायत सदस्य) हे होते तर प्रमुख उपस्थितीमध्ये माननीय कृष्णाराव पांडुरंग नांगरे तसेच महाविद्यालयाचे IQAC समन्वयक प्रोफेसर शंकर माने, मधुकर हुबाले, बाबुराव हुबाले उपस्थित होते.

**बुधवार दिनांक 7 जानेवारी 2026** रोजी सकाळच्या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी गावातील प्लास्टिक पोत्यामध्ये गोळा केली तसेच गावातील संपूर्ण रस्त्यांची सफाई व गटारांचे स्वच्छता केली. तसेच बहे रस्त्यावरील टाकलेला कचरा गोळा करून ट्रॉलीमध्ये

भरला आणि रस्त्यांच्या कडेला उगवलेले झुडपांची स्वच्छता केली. जिल्हा परिषद शाळेतील अंगण स्वच्छ केले. मुलीनी संपूर्ण गावालीत कुटुंबातील सर्वे केला त्यामध्ये आभा कार्ड, रेशन कार्ड, आधार कार्ड, गॅस कनेक्शन, दिव्यांग प्रमाणपत्र व इतर पेन्शन श्रावणबाळ, संजय गांधी, महिला बचत गट सदस्य, कुटुंबातील व्यक्ती तसेच महिलांचे एच.बी तपासणीचा सर्वे करण्यात आला. सायंकाळच्या सत्रामध्ये **'बदलती ग्रामीण व्यवस्था आणि आजचे युवक'** या विषयावर प्राध्यापक सुरज चौगुले, वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द यांचे व्याख्यान झाले. यावेळी अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त केंद्रप्रमुख वाळवा पंचायत समिती समितीच्या सौ. मंगल प्रकाश कनप  होत्या, प्रमुख उपस्थितीमध्ये श्री सचिन सूर्यवंशी हे उपस्थित होते.

**गुरुवार दिनांक 8 जानेवारी 2026 रोजी** सकाळच्या सत्रामध्ये सर्व स्वयंसेवकांनी जिल्हा परिषद मराठी शाळेच्या परिसरामध्ये परसबाग तयार करण्यासाठी जमिनीचे सपाटीकरण करण्यात आले. व त्याचे आठ सम भागात विभाजन करण्यात आले. त्यासाठी पाण्याचा पाठ करण्यात आला. तसेच शाळेसभोवताली असणाऱ्या झाडांना पाणी देण्यासाठी पाठ केले.

दुपारच्या सत्रामध्ये कृषी विस्तार अधिकारी वाळवा पंचायत समितीचे मा. श्रीधर कुलकर्णी यांचे **'पर्यावरण संरक्षण व संवर्धन काळाची गरज'** या विषयावर मार्गदर्शन झाले तसेच सामाजिक प्रबोधनातून नैतिक मूल्यांची शिकवण या विषयावर मा. संजय तात्या हुबाले यांचे प्रवचन देखील झाले. सायंकाळच्या सत्रामध्ये वाळवा तालुका विधी सेवा समिती इस्लामपूर, वकील संघटना इस्लामपूर यांच्यावतीने **'विधी साक्षरता शिबिराचे'** आयोजन करण्यात आले होते यावेळी 'आंतरराष्ट्रीय मानवी तस्करी कायदा', 'लोकोपयोगी सरकारी पेन्शन योजना कायदा', 'पीडित व्यक्तींच्या नुकसान भरपाई संबंधित कायदा', 'बाल लैंगिक अत्याचार कायदा', 'मोटार वाहन अपघात कायदा' या विषयावर माननीय जिल्हा न्यायाधीश व इतर न्यायाधीशांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले या शिबिराचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश -1 इस्लामपूरचे मा.श्री देविदास केळुसकर हे होते प्रमुख उपस्थितीमध्ये महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड  एन.आर. पाटील (काका) हे होते.

**शुक्रवार दिनांक 9 जानेवारी 2026** रोजी सकाळच्या सत्रामध्ये हुबालवाडी गावातील 'स्मशानभूमी परिसराची स्वच्छता केली तसेच प्लास्टिक गोळा केले. दुपारच्या सत्रामध्ये डॉ. रूपाली अमित शेडगे (समुदाय आरोग्य अधिकारी, आयुष्यमान आरोग्य मंदिर, बहे) यांच्याकडून मुलींसाठी आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये मुलींचे हिमोग्लोबिन तपासण्यात आले. सायंकाळच्या सत्रामध्ये प्रसिद्ध उद्योजक

मा. मधुकर तुकाराम हुबाले यांचे **‘युवकांना उद्योग क्षेत्रातील संधी’** या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते तसेच मा. दिलीप क्षीरसागर यांचा **‘चला हसुया’** हा मनोरंजनात्मक कार्यक्रम देखील झाला या कार्यक्रमाचे अध्यक्ष हुबालवाडी गावचे उपसरपंच माननीय अंकुश घाडगे तर प्रमुख उपस्थितीमध्ये बहे सोसायटीचे चेअरमन माननीय आविष्कार नांगरे हे उपस्थित होते.

**शनिवार दिनांक 10 जानेवारी 2026 रोजी** सकाळच्या सत्रामध्ये हुबालवाडी गावातून **‘पर्यावरण संरक्षण व संवर्धन’** विषयक जनजागृती रॅली काढण्यात आली. तदनंतर बिरोबा मंदिर परिसरातील खडी व वाळू एकत्र करून पोत्यामध्ये भरून ठेवण्यात आली व टेरेसची स्वच्छता व सफाई करण्यात आली. सायंकाळच्या सत्रामध्ये माननीय हौसेराव सर्जेराव हुबाले यांचे **‘सोशल मीडियाच्या जाळ्यात अडकलेली आजची तरुणाई’** या विषयावर प्रबोधनात्मक व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी उपसरपंच मा. कृष्णा यशवंत हुबाले (माजी चेअरमन बहे सोसायटी) हे तर प्रमुख उपस्थितीमध्ये माननीय अक्षय तानाजी फुलारे हे होते.

**रविवार दिनांक 11 जानेवारी 2026 रोजी** विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या सांगता समारंभाचे प्रमुख पाहुणे महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड एन. आर. पाटील (काका) हे होते तर अध्यक्ष प्रसिद्ध उद्योजक मा. बाबुराव तुकाराम हुबाले हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये महात्मा फुले शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष मा. सुनिल पाटील साहेब, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे, हुबालवाडी गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ.मंगल बाबुराव हुबाले, उपसरपंच अंकुश घाडगे, माननीय मधुकर हुबाले, सौ.मंगल कनप, कृष्णा हुबाले, प्रकाश शिंदे, अक्षय फुलारे, संजय तात्या हुबाले, सुनील फुलारे आदी उपस्थित होते.




विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटक पोलिस निरीक्षक मा. सोमनाथ वाघ मार्गदर्शन करताना




स्वयंसेवक व्यायाम करताना




जिल्हा परिषद शाळा परिसराची स्वच्छता करताना स्वयंसेवक




गटाराची सफाई करताना स्वयंसेवक




आभा कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड सर्व्हे करताना विद्यार्थिनी




जिल्हा परिषद शाळा प्रांगणात परसबागे साठी पाण्याचा पाट करताना स्वयंसेवक




परसबागे साठी जमिनीचे सपाटीकरण करताना स्वयंसेवक




परसबागे साठी जमिनीचे सपाटीकरण करताना स्वयंसेवक




परसबागे साठी जमिनीचे सपाटीकरण करताना स्वयंसेवक




परसबाग ठिकाणी दगड गोटे उचलताना स्वयंसेवक




HB तपासताना डॉ. रुपाली शेडगे




श्मशान भूमि परिसराची सफाई करताना स्वयंसेवक




श्मशान भूमि परिसराची सफाई करताना स्वयंसेवक



श्मशान भूमि परिसराची सफाई करताना स्वयंसेवक




पर्यावरण संरक्षण व संवर्धन विषयक जनजगृती फेरी




बिरोबा मंदिर परिसरातील खडी व वाळू एकत्र करताना स्वयंसेवक




जिल्हा परिषद शाळा परिसरात वृक्षारोपण संजय तात्या हुबाले प्राचार्य डॉ. नितीन शिंदे




अंगणवाडी परिसरात लहान मुलांना बाथरूम जाण्यासाठी रस्ता तयार करताना स्वयंसेवक




श्रद्धा,अंधश्रद्धा आणि वैज्ञानिक दृष्टीकोन या विषयावर मार्गदर्शन करताना मा.दीपक कोठावळे




बदलती ग्रामव्यवस्था आणि आजचे युवक या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ.सुरज चौगुले




पर्यावरण संरक्षण आणि आजचा युवक या विषयावर मार्गदर्शन करताना मा. सुधीर कुलकर्णी




सामाजिक प्रबोधनातून नैतिक मूल्यांची शिकवण यावर प्रवचन देताना मा. संजय तात्या हुबाले




कायदा विषयक शिबिरात मार्गदर्शन करताना न्यायधीश मा. देविदास केळुसकर




कायदा विषयक शिबिरात मार्गदर्शन करताना ॲड एन.आर.पाटील काका




उद्योग क्षेत्रात युवकांना रोजगराच्या संधी या विषयावर बोलताना मा. मधुकर हुबाले



'चला हसुया' या विषयावर बोलताना मा. दिलीप क्षीरसागर




सोशल मिडियाच्या जाळयात अडकलेली तरुणाई या विषयावर मार्गदर्शन करताना मा.हौसेराव हुबाले




विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या सांगता समारंभाचे प्रमुख पाहुणे ॲड एन.आर.पाटील काका




कॉलेजचे प्राचार्य डॉ.नितीन शिंदे मनोगत व्यक्त करताना




विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या सांगता समारंभाचे अध्यक्ष मा. बाबुराव हुबाले

# युवकांना नोकरीपेक्षा उद्योजकतेतून उज्वल भविष्य शक्य : मधुकर हुबाले

■ बंधुता न्यूज नेटवर्क



ईश्वरपूर : कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण इस्लामपूर राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हुबालवाडी येथे सुरू असलेल्या विशेष श्रम संस्काराच्या पाचव्या दिवशी आयोजित व्याख्यानासाठी प्रसिद्ध उद्योजक मधुकर तुकाराम हुबाले उपस्थित होते, तसेच दुसरे व्याख्याते दिलीप क्षीरसागर यांनी चला हसूया च्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे मनोरंजन केले या कार्यक्रमाचे अध्यक्ष हुबालवाडी गावचे उपसरपंच अंकुश विश्वास घाडगे तर प्रमुख उपस्थितीमध्ये आविष्कार नांगरे उपस्थित होते यावेळी मार्गदर्शन करताना हुबाले युवकांना उद्योगांमध्ये विविध संधी आहेत त्या शोधून जिद्द, चिकाटी, कठोर परिश्रम यांच्या जोरावरती व्यवसायामध्ये सातत्य ठेवल्यास आपले करिअर करू शकतात. व्यवसाय क्षेत्रामध्ये अनेक संधी उपलब्ध आहेत त्या संधीचा युवकांनी विचार करावा एका दिवसात व्यवसाय यशस्वी होत नाही त्यासाठी व्यवसायात सातत्य अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले म्हणाले या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक धनराज साळुंखे याने केले.

मंगळवार दि. १३/०१/२०२६ बंधुता

# युवकांच्या माध्यमातून विकासाचे पाऊल प्रभावी उचलता येते

■ बंधुता न्यूज नेटवर्क

ईश्वरपूर : महात्मा फुले शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज उरुण इस्लामपूरच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने हुबालवाडी येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या सांगता समारंभाचे प्रमुख पाहुणे महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ड. एन.आर.पाटील काका हे होते तर अध्यक्ष प्रसिद्ध उद्योजक बाबुराव हुबाले (माजी संचालक राजारामबापू सहकारी बँक )हे होते प्रमुख उपस्थितीमध्ये महात्मा फुले शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष माननीय सुनील पाटील साहेब, प्राचार्य डॉ. नितीन शिंदे,मधुकर हुबाले होते यावेळी बोलताना ड .एन.आर.पाटील काका म्हणाले युवा शक्तीचा वापर विधायक कार्यासाठी करणे आवश्यक आहे .युवक संपूर्ण देश बदलू शकतात. युवकांनी आपले व्यक्तिमत्व उज्वल करावे श्रम प्रतिष्ठा जपावी बौद्धिक विकास करावा आपले ध्येय गाठण्यासाठी कठोर परिश्रम, मेहनत आणि सातत्य ठेवून आत्मविश्वासपूर्वक ध्येयाच्या मागे लागल्यास यश तुमच्या दाराशी निश्चित येईल.

राष्ट्रीय सेवा योजना ही युवकांना सामाजिक जाणीव,सेवाभावी कर्तव्य भावना आणि नेतृत्व गुण वाढ दृढ करणारी प्रभावी चळवळ असून श्रमसंस्कार



शिबिरांच्या माध्यमातून येणारे अनुभव विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व वृद्धिंगत करतात तसेच ते अनुभव आयुष्यभर उपयोगी ठरत असतात युवकांनी असल्या शिबिरामध्ये सहभागी होणे गरजेचे आहे कार्यक्रमाचे अध्यक्ष बाबुराव हुबाले म्हणाले युवकांनी विज्ञान आणि अध्यात्माशी सांगड घालून आपले जीवन व्यतीत करावे. सत्यात रहावे कष्ट करून धनप्राप्त करावे तरुणांनी समाजसेवेची आवड जोपासावी त्यातून देशाचा विकास निश्चित होईल.

यावेळी प्राचार्य नितीन शिंदे, मा.संजय तात्या हुबाले, मा.सुनील फुलारे यांनी आपले मनोगते व्यक्त केली या कार्यक्रमावेळी हुबालवाडी गावच्या सरपंच मंगल बाबुराव हुबाले, उपसरपंच अंकुश घाडगे माजी उपसरपंच कृष्णा हुबाले, प्रकाश शिंदे, मंगल कनफ, अक्षय फुलारे, ग्राम महसूल अधिकारी अमर वाटेगावकर तसेच ग्रामपंचायतचे आजी-माजी सदस्य कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे स्वागत प्रास्ताविक प्रो.डॉ.संतोष खडसे यांनी तर अहवाल वाचन डॉ.प्रकाश आठवले यांनी केले या कार्यक्रमाचे आभार प्रा .संदीप पाटील यांनी तर सूत्रसंचालन अश्विनी थोरात यांनी केले.

पुण्य नगरी

# कौशल्याच्या जोरावर भविष्य उज्ज्वल करा

## डॉ. सूरज चौगुले

**ईश्वरपूर / प्रतिनिधी**

आजच्या तरुणाला केवळ माणसांशीच नाही तर कृत्रिम बुद्धिमत्तेशी स्पर्धा करावी लागणार आहे. अशा काळात तरुणांनी आपले कौशल्य विकसित करून स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून स्वतःचे भविष्य उज्वल करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन डॉ. सूरज चौगुले यांनी केले.

हुबालवाडी येथे कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजच्या




**हुबालवाडी : येथील कार्यक्रमात बोलताना डॉ. सुरज चौगुले. मंचावर अध्यक्ष मंगल कनफ उद्योगपती बाबुराव हुबाले, सचिन सूर्यवंशी.**

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिरात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मंगल कनप तर प्रमुख पाहुणे म्हणून सचिन सूर्यवंशी उपस्थित होते.

मंगल कनप यांनी सांगितले की, तरुणांनी क्रांतिकारक आणि समाजसेवकांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपली वर्तणूक ठेवावी. विद्यार्थ्यांमध्ये लहानपणापासूनच श्रमसंस्कार आणि श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये रुजवणे काळाची गरज आहे. विराज खामकर यांनी स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांचा परिचय संहिता पाटील हिने करून दिला. हिमांशू मोरे याने सूत्रसंचालन तर सोहम पाटील याने आभार मानले.

# तरुण पिढी सोशल मिडियाच्या विळख्यात

## पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ : केबीपीचे हुबालवाडी येथे श्रमसंस्कार शिबिर

प्रतिनिधी
ईश्वरपूर

तरुण पिढीसमोर खूप मोठे आव्हाने आहेत. मात्र आजची तरुण पिढी मोबाईल आणि सोशल मीडियाच्या विळख्यात अडकलेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांवर संस्कार टाकण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर हे उत्तम विद्यापीठ आहे, असे मत पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांनी केले.

वाळवा तालुक्यातील हुबालवाडी येथे केबीपी कॉलेजचे राष्ट्रीय सेवा योजनेचे श्रमसंस्कार शिबिर पार पडले. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे होते.

यावेळी सोमनाथ वाघ पुढे म्हणाले, मुला-मुलींच्या बाबतीत पालकांच्या तक्रारी आहेत. विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम केले पाहिजेत.



ईश्वरपूर : हुबालवाडी येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलताना पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ.

प्रास्ताविक आणि प्रमुख पाहुण्याचा परिचय प्रा. डॉ. प्रकाश आठवले यांनी केले. आभार प्रा. संदीप पाटील यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा. वंदना पाटील व श्रीमती अश्विनी थोरात यांनी केले. यावेळी डॉ. संतोष खडसे, ज्योती कथलकर, डॉ. जाविद शेख, जयकर पवार, सुभाष कांबळे यांनी प्रयत्न केले.

यावेळी सरपंच मंगलताई हुबाले, उपसरपंच अंकुश घाडगे, बाबुराव हुबाले, मधुकर हुबाले, प्रकाश शिंदे, सुनील फुलारे, संजय हुबाले यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

पुण्य नगरी

# विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करणे आवश्यक

## सोमनाथ वाघ



ईश्वरपूर : श्रमसंस्कार शिबीर उद्घाटन समारंभात बोलताना सोमनाथ वाघ. सोबत डॉ. नितीन शिंदे व अन्य.

**ईश्वरपूर / प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचे स्वप्न काय आहे हे समजून घेतले पाहिजे. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले पाहिजेत, असे मत पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांनी केले.

ते हुबालवाडी येथे के.बी.पी. कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे होते. डॉ. प्रकाश आठवले यांनी स्वागत केले. संदीप पाटील यांनी आभार मानले तर, वंदना पाटील आणि अश्विनी थोरात यांनी सूत्रसंचालन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. संतोष खडसे, ज्योती कथलकर, डॉ. जाविद शेख, जयकर पवार, सुभाष कांबळे यांनी प्रयत्न केले. हुबालवाडी येथील सरपंच मंगलताई हुबाले, उपसरपंच अंकुश घाडगे, उद्योगपती बाबुराव हुबाले, मधुकर हुबाले तसेच माजी उपसरपंच प्रकाश शिंदे, सुनील फुलारे, संजय हुबाले यांच्यासह ग्रामपंचायतचे आजी - माजी सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

Sangli Edition
Jan 08, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

विद्यार्थ्यांनी कठोर परिश्रम करणे आवश्यक

सोमनाथ वाघ



ईश्वरपूर : श्रमसंस्कार शिबीर उद्घाटन समारंभात बोलताना सोमनाथ वाघ. सोबत डॉ. नितीन शिंदे व अन्य.

ईश्वरपूर / प्रतिनिधी

विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचे स्वप्न काय आहे हे समजून घेतले पाहिजे. ते स्वप्न पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम घेतले पाहिजेत, असे मत पोलीस निरीक्षक सोमनाथ वाघ यांनी केले.

ते हुबालवाडी येथे के.बी.पी. कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. नितीन शिंदे होते. डॉ. प्रकाश आठवले यांनी स्वागत केले. संदीप पाटील यांनी आभार मानले तर, वंदना पाटील आणि अश्विनी थोरात यांनी सूत्रसंचालन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. संतोष खडसे, ज्योती कथलकर, डॉ. जाविद शेख, जयकर पवार, सुभाष कांबळे यांनी प्रयत्न केले. हुबालवाडी येथील सरपंच मंगलताई हुबाले, उपसरपंच अंकुश घाडगे, उद्योगपती बाबुराव हुबाले, मधुकर हुबाले तसेच माजी उपसरपंच प्रकाश शिंदे, सुनील फुलारे, संजय हुबाले यांच्यासह ग्रामपंचायतचे आजी - माजी सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.